DAY — 17 SEAT NUMBER

| 2023 | III | 15 | 1500 | J-362 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# PSYCHOLOGY (48)

Time : 3 Hrs. (4 Pages) Max. Marks : 80

*सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*
*(२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.*
*(३) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पृष्ठावर करावा.*

**प्र. १.** (अ) कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करून पुन्हा लिहा : (५)[२०]

(१) आत्मनिरीक्षण पद्धतीचा अवलंब ------ यांनी केला.
(अ) विल्हेम वुंट (ब) कार्ल रॉजर्स
(क) डॉ. सिग्मंड फ्रॉईड

(२) मानसिक वयाची संकल्पना सर्वप्रथम ------ यांनी मांडली.
(अ) आल्फ्रेड बीने (ब) वेश्लर
(क) स्टर्न

(३) वाक्यपूर्ती चाचणी -------- मापन करते.
(अ) व्यक्तिमत्त्वाचे (ब) बुद्धिमत्तेचे
(क) अवधान कक्षेचे

(४) टोलमन हे ------ अध्ययनासाठी ओळखले जातात.
(अ) निरीक्षणात्मक (ब) अनुकूलन
(क) बोधात्मक

(५) मानसिक आरोग्यासाठी प्रथमोपचार घेताना ------ मदत घ्यावी.
(अ) मित्राची (ब) शिक्षकाची
(क) व्यावसायिक तज्ज्ञाची

(ब) खालील 'अ' व 'ब' गटांतील शब्दांच्या योग्य जोड्या लावा : (५)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) मानसशास्त्र | (१) जागरूक अवस्था |
| (ब) व्यक्तिमत्त्व | (२) नैसर्गिकशास्त्र |
| (क) कॅनन आणि बार्ड | (३) परसोना |
| (ड) भ्रांती | (४) भावनांचा सिद्धांत |
| (इ) सजगता | (५) सामाजिक शास्त्र |
| | (६) छिन्नमनस्कता |

(क) खालील विधाने 'बरोबर' आहेत की 'चूक' ते लिहा : (५)

(१) आशिषने संजयवर अध्ययनाचा प्रयोग केला; तर या प्रयोगात आशिष प्रयुक्त आहे.

(२) रोहनचे मानसिक वय ८ आणि शारीरिक वय १० आहे म्हणून रोहनच्या बुद्धिमत्तेचा स्तर सामान्यापेक्षा जास्त आहे.

(३) संगीतकाराला अचानक प्रकाश चमकावा तशी गाण्याला चाल सुचली, सर्जनशील विचारप्रक्रियेत याला प्रदीपण म्हणतात.

(४) सायलीने शिथिलीकरण तंत्राचा वापर केल्यास तिला राग व्यवस्थापनाला मदत होईल.

(५) आधार देणे, माहिती पुरविणे हे मानसिक आरोग्यासाठीच्या प्रथमोपचाराचे कौशल्य नाही.

(ड) खालील प्रश्नांची प्रत्येकी '<u>एका</u>' वाक्यात उत्तरे लिहा : (५)

(१) राजकीय मते, ग्राहकांची पसंती अशा विषयांवर माहिती गोळा करण्यासाठी सर्वसाधारणपणे मानसशास्त्राची कोणती पद्धत वापरतात?

(२) रोगांचे निदान करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या यंत्रांमध्ये कोणत्या प्रकारच्या बुद्धिमत्तेचा वापर केला जातो?

(३) विद्यार्थ्यांनी प्राचार्यांची मुलाखत घेताना प्राचार्यांच्या प्रतिसादानुसार ऐनवेळी प्रश्न वाढवले. विद्यार्थ्यांनी मुलाखतीचा कोणता प्रकार वापरला?

(४) एखाद्या वस्तूबद्दल वाटणारी अकारण भीती म्हणजे काय?

(५) सकारात्मक मानसशास्त्राचे जनक कोणाला म्हणतात?

प्र. २. खालील प्रश्नांची प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा ( कोणतीही पाच ) : [१०]

(१) लवचिकतेचे कोणतेही दोन घटक स्पष्ट करा.

(२) वृत्तेतिहास पद्धती तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(३) भावनिक बुद्धिमत्ता म्हणजे काय?

(४) प्रधानगुणविशेष म्हणजे काय? ते सांगून तुमच्या व्यक्तिमत्त्वातील एका प्रधानगुणविशेषाचे नाव लिहा.

(५) सामान्य चिंताविकृतीची तुम्हाला जाणवणारी लक्षणे लिहा.

(६) अवसाद किंवा खिन्नताविकृतीची लक्षणे लिहा.

(७) आनंद निश्चित करणारे तुम्हाला जाणवणारे कोणतेही दोन घटक स्पष्ट करा.

प्र. ३. खालील बाबींवर प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत टिपा लिहा ( कोणत्याही चार ) : [१२]

(१) शास्त्राची कोणतीही तीन वैशिष्ट्ये

(२) अवधान विभाजन

(३) भावनिक अनुभवांतील शरीरांतर्गत व बाह्य बदल

(४) आघात पश्चात तणाव विकृती

(५) मानसिक आरोग्यासाठीच्या प्रथमोपचारातील अडथळे

(६) तर्कसंगत व्यक्तीची कोणतीही तीन वैशिष्ट्ये

प्र. ४. खालील उदाहरणांवर आधारित प्रश्नांची केवळ शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही चार) : [८]

(१) सरिताने आपल्या मुलाच्या जन्मापासून तो १० वर्षाचा होईपर्यंत त्याच्या शारीरिक, भाषिक विकासाच्या नोंदीचा एक तक्ता तयार केला. हा तक्ता तयार करतांना सरिताने मानसशास्त्राची कोणती अभ्यासपद्धती उपयोगात आणली?

(२) सुजाता कंपनीतील वरिष्ठांशी आणि सहकाऱ्यांशी सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित करते तसेच तिच्या हाताखालील कर्मचाऱ्यांकडून सहकार्य प्राप्त करून घेण्याची क्षमता ठेवते. सुजातामध्ये कोणत्या प्रकारची बुद्धिमत्ता अधिक प्रमाणात आहे?

(३) सलोनी एकाच दृष्टिक्षेपात ७ ते ८ उद्दीपकांकडे सहज लक्ष देऊ शकते. तसेच पोस्टाचे पीनकोड सहजपणे लक्षात ठेवते. सलोनीचे हे वर्णन अवधानाच्या कोणत्या अंगाचे आहे?

(४) महाविद्यालयाच्या आवारात दुचाकी कोणी कुठे लावावी याबाबत मित्रांमध्ये चर्चा सुरू असतांना शैलेशच्या आवाजाचा स्तर वाढला, तो आक्रमक झाला, मित्रांच्या अंगावर धावून आला. या प्रसंगात शैलेश कोणती मूलभूत भावना अनुभवत असेल?

(५) विहान गेली अनेक वर्षे अतिप्रमाणात मद्यपान करतो, त्याचे कोणत्याही कामात लक्ष लागत नाही. मद्यपान थांबवण्याचे वारंवार प्रयत्न करूनही त्याची समस्या कमी होत नाही. ही लक्षणे कोणत्या मानसिक विकृतीची असावीत?

(६) तौक्ते वादळामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले असतानाही कष्ट करून पुन्हा परिस्थिती पूर्ववत करता येईल असा विश्वास हनमंता बाळगतो. हनमंताच्या वर्तनातील सकारात्मक गोष्ट कोणती?

**प्र. ५. खालील संकल्पना २५ ते ३० शब्दांत स्पष्ट करा ( कोणत्याही पाच ) :** [१०]

(१) शून्याच्यावरील जीवन

(२) सत्सद्विवेकबुद्धी

(३) निरीक्षणात्मक अध्ययन

(४) भाषिक गैरवर्तन

(५) इंटरनेटचे परावलंबित्व

(६) नि:पक्षपातीपणे ऐकणे

(७) शारीरिक लवचिकता

**प्र. ६. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रत्येकी ८० ते १०० शब्दांत लिहा :** [१०]

(१) समस्या परिहाराच्या पायऱ्या स्पष्ट करा :

मुद्दे- (i) समस्या ओळखणे (ii) पर्यायी उपाय शोधणे (iii) एखादा पर्याय निवडणे (iv) पर्यायाची अंमलबजावणी करून पाठपुरावा करणे

(२) भावनिक सुदृढतेचे तुम्हाला होणारे लाभ स्पष्ट करा :

मुद्दे- (i) ताणाशी समायोजन (ii) उच्च स्वनियमन (iii) कार्यक्षमता विकास (iv) जीवनाविषयी समाधानी वृत्ती

(३) मानसिक विकृतीचे निकष स्पष्ट करा :

मुद्दे- (i) चिकित्सालयीन लक्षणे (ii) मनस्ताप व अक्षमता (iii) कार्यात्मक बिघाड (iv) तीव्र ताणकांना दिली जाणारी सर्वसामान्य अपेक्षित प्रतिक्रिया मानसिक विकृतीचे लक्षण मानले जात नाही

**प्र. ७. पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १५० ते २०० शब्दांत स्पष्ट करा :** [१०]

(१) बुद्धिमापन चाचण्यांचा इतिहास सविस्तर लिहा.

(२) व्यक्तिमत्त्वमापनाची विविध तंत्रे स्पष्ट करा.

◆◆◆